निवेशक संबंध विभाग
प्रधान कार्यालय :
स्टार हाउस, सी–5,"जी" ब्लॉक,
8वी मंजिल,
बांद्रा कुर्ला संकुल,
बांद्रा (पूर्व ),
मुंबई - 400 051
दूरध्वनि : (022)- 6668 4490
फेक्स : (022)- 6668 4491
इमेल:headoffice.share@bankofindia.co.in

बैंक ऑफ इंडिया Bank of India BOI

**INVESTOR RELATIONS CELL**
**HEAD OFFICE :**
**Star House, C-5, "G" Block,**
**8th Floor (East Wing),**
**Bandra- Kurla Complex,**
**Bandra (East)**
**Mumbai – 400 051**
**Phone : (022)- 6668 4490**
**Fax : (022)- 6668 4491**
**E-Mail : headoffice.share@bankofindia.co.in**

**संदर्भ क्र. Ref. No.:** HO:IRC:RB:2020-21:22

**दिनांक Date:**11.05.2020

| **Script Code: BANKINDIA** | **Script Code: 532149** |
|---|---|
| The Vice President – Listing Department,<br>National Stock Exchange of India Ltd.,<br>Exchange Plaza,<br>Bandra Kurla Complex, Bandra East,<br>Mumbai 400 051. | The Vice-President – Listing Department,<br>BSE Ltd.,<br>25, P.J. Towers, Dalal Street,<br>Mumbai 400 001. |

Dear Sir/Madam,

**Submission of copies of Newspaper Advertisement in r/o Notice for Payment of Interest and Exercise of Call Option of 8.48% Bank of India Upper Tier II Bonds- Series VI**

Pursuant to Regulation 47 of SEBI (Listing Regulations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we enclose the copies of advertisement published in newspapers in respect of **Record Date of 11.05.2020** for the purpose of payment of Interest and exercise of Call Option on our Bank's upper Tier II Bonds-Series VI (ISIN No. INE084A09217).

This is for your information and appropriate dissemination.

**धन्यवाद** Thanking you,

**भवदीय** Yours faithfully,

**(राजीव भाटिया Rajeev Bhatia)**
**कंपनी सचिव Company Secretary**

बैंक ऑफ इंडिया BANK OF INDIA प्र.का. H.O. निवेशक संबंध कक्ष Investor Relations Cell

Encl.: As Above.

# तैवानतर्फे फ्यूचर-रेडी कार्यस्थळांसाठी तंत्रज्ञान सोल्यूशन्स सादर

मुंबई, ता. ८ : जग कोविड-१९ महामारीचा सामना करत असताना जगभरात दूरूनच काम आणि ऑनलाइन अध्ययनाला मोठी चालना मिळाली आहे. कंपन्या सद्यस्थितीमध्ये आलेल्या महामारीसारख्या वादळाचा सामना करू शकणारी फ्यूचर-रेडी कार्यस्थळे निर्माण करू पाहत आहेत. तंत्रज्ञान व ऑटोमेशन विचारसरणीशी जलदपणे संलग्न होणारे व्यवसाय आगामी भविष्यात लाभदायी ठरण्याची अपेक्षा आहे.या संकटादरम्यान व्यवसाय व शिक्षण सुरळीतपणे सुरू राहण्याच्या खात्रीसाठी घरातूनच सुरक्षितपणे काम व अध्ययनाची सुविधा देणा-या प्रबळ,वापरण्यास सुलभ संप्रेषण साधनांची गरज आहे. कोविड-१९ संकटाचे परिणाम दीर्घकाळापर्यंत राहण्याचा अंदाज असल्यामुळे तैवान सारख्या देशांनी संवेदनक्षम व लवचिक सहयोगात्मक साधने सादर करण्याच्या उद्देशाने माहितीप्रधान व्यासपीठे निर्माण करण्याकरिता पुढाकार घेतला आहे. गुरूवार ८ मे रोजी तैवान एक्सलन्सने थेट प्रसारित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेचे आयोजन केले. या पत्रकार परिषदेमध्ये तैवानची काम व शिक्षणासाठी रिमोट व्हिडिओ कॉन्फरन्सिंगमधील उल्लेखनीय सोल्यूशन्स दाखवण्यात आली. तैवान एक्सलन्स ही ब्युरो ऑफ फॉरेन ट्रेड आणि तैवान एक्सटर्नल ट्रेड डेव्हलपमेंट काऊन्सिल (टायट्रा)द्वारे सचांलित आंतरराष्ट्रीय प्रमोशनल कॅम्पेन आहे. या परिषदेमध्ये पाच अव्वल तैवानी ब्रॅण्ड्स दूरस्थ संवादाचा दर्जा व उपयोजन सुधारणारी त्यांची नवीन उत्पादने दाखवताना दिसली. यामध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व लाइव्ह-कास्टिंगसह यू-अनेबलिंग रिमोट वर्किंग,दूरस्थ शिक्षणासाठी एव्हर क्लासरूम टेक्नोलॉजी सोल्यूशन्स,उत्तम सहयोग व ऑन-जॉब लर्निंगसाठी काम करण्याची नवीन पद्धत,क्यू.कॉन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सोल्यूशन आणि क्यू क्लास अशा विषयांवरील सादरीकरणांच्या शृंखलेचा समावेश होता.प्रबळ आयसीटी तंत्रज्ञान आणि नाविन्येप्रती आवडीमुळे तैवानी ब्रॅण्ड्सनी भारतासह जागतिक बाजारपेठांमध्ये त्यांची उपस्थिती निर्माण केली आहे. तसेच त्यांची अनेक उत्पादने काम करण्याच्या व अध्ययनाच्या नवीन पद्धतींना अनुकूल अशी आहेत. गेल्या विविध दशकांपासून तैवान तंत्रज्ञान अग्रणी म्हणून त्यांची उपस्थिती जलदपणे अधिक सक्षम करत आले आहेत. उदयोन्मुख तंत्रज्ञानांच्या विकासासाठी सक्रिय दृष्टिकोन राखत देश इलेक्ट्रॉनिक डिवाईसेसच्या वायरलेस कनेक्टिव्हीटीच्या वाढत्या अवलंबतेमुळे जागतिक स्तरावरील उपस्थिती अधिक प्रबळ करत आहे.भारतासारख्या देशांमध्ये अनेक कंपन्या प्रबळ व टिकाऊ रिमोट वर्किंग सोल्यूशन्सचा उत्कटतेपणे शोध घेत आहेत. कारण त्यांनी अशा महामारी सारख्या अचानक बदलाचा कधीचा विचार केलेला नव्हता आणि अशा संकटांचा सामना करण्यासाठी त्यांची तयारी देखील नव्हती. शैक्षणिक संस्थांना देखील वैयक्तिक अभ्यासक्रमांना ऑनलाइन कोर्सेसमध्ये रूपांतरित करण्यामध्ये संघर्ष करावा लागत आहे. आता गतीशीलता,सुरक्षा आणि सहयोगाच्या स्वातंत्र्याला पाठिंबा देणा-या तंत्रज्ञान साहित्यांसाठी सर्वाधिक गरज निर्माण झाली आहे.

यासंदर्भात तैवानी कंपन्यांनी कोणत्याही अडथळ्यांशिवाय दूरूनच काम व अध्ययनाची सुविधा देण्यासाठी योग्य तंत्रज्ञान सोल्यूशन्स देत पोकळी भरून काढण्यामध्ये मदत करण्याकरिता पुढाकार घेतला आहे. प्रमुख तैवानी ब्रॅण्ड्स सध्या जगाला सर्वाधिक गरज असलेले तंत्रज्ञान व वापरण्याजोगी सुधारित सहयोगात्मक साधने देत आहेत.गुरूवारी आयोजित करण्यात आलेल्या परिषदेमध्येएव्हरने शिक्षकांना वाहून नेण्यास सोयीस्कर असलेले वजनाने अत्यंत हलके साधन'मेकॅनिकल आर्म वायरलेस इंटरॲक्टिव्ह व्हिज्युअलायझर'दाखवले. या साधनामध्ये ४ के १३ मेगापिक्सल कॅमेरा आणि ६० एफपीएस इमेजिंग आहे,जे सूक्ष्मातिसूक्ष्म गोष्ट न चुकवता अध्यापन अचूकतेने सादर करते. हे साधन दूरूनच अध्यापनाची सुलभ सुविधा देण्यासाठी नेटवर्क कॅमेरा म्हणून देखील काम करू शकते. तसेच,बीएक्सबीने त्यांचे'क्यू. कॉन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सोल्यूशन'दाखवले. हे साधन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा दर्जा सुधारण्यामध्ये मदत करते. त्याची लेन्स आपोआपपणे ट्रॅकिंग करू शकते आणि बिल्ट-इन कार्डोइड मायक्रोफानसह सहभागींची माहिती देऊ शकते,वक्त्यांच्या आवाजांचे आपोआपपणे निदान करू शकते आणि मागील आवाज ब्लॉक करू शकते. क्यू. कॉन विविध व्यासपीठांना देखील पाठिंबा देऊ शकते,जसे यू मीटिंग, स्कायपे,गुड मीट्स,मायक्रोसॉफ्ट टीम्स,झूम व लाइनआघाडीचा ब्रॅण्डसायबरलिंकने त्यांचे'यू कम्युनिकेशन सूट'साधन दाखवले.

हे साधन ऑनलाइन मीटिंग्ज, प्रेझेन्टेशन्स व बिझनेस चॅटसाठी पूर्णत: एकीकृत सेवेसह व्यवसाय संवादासाठी डिझाइन करण्यात आले आहे. या ॲप्लीकेशनमध्ये कोणत्याही डिवाईसवरील सुलभ वापर, प्रमुख मुद्यांचा रेकॉर्ड ठेवण्याकरिता प्रशासनासाठी परिपूर्ण कंपनी व्यवस्थापन, आंतरराष्ट्रीय मान्यताकृत'माहिती सुरक्षा प्रमाणपत्र'आणि एआय तंत्रज्ञानाचे पाठबळ असलेली अद्वितीय व्हिडिओ क्वॉलिटी यांचा समावेश आहे.तसेच डेल्टाचीडेल्टाकेएनईडब्ल्यू अकॅडमी'दाखवण्यात आली. हे स्मार्ट लर्निंगसाठी एक नाविन्यपूर्ण व खुले व्यासपीठ आहे. यामध्ये व्यावसायिक व उद्योजकांना आधुनिक इंडस्ट्री ४.० कौशल्यांसह सक्षम करण्यासाठी पेटन्टेड अध्ययन अनुभव डिझाइन करण्यात आला आहे. वेब व्हर्जन आणि मोबाइल ॲप अशा दोन्ही सुविधांसह डेल्टाकेएनडब्ल्यू अकॅडमीकर्मचा-यांना रिस्किलिंग आणि अपस्किलिंगसाठी वैविध्यपूर्ण व वैयक्तिकृत अध्ययन सुविधा प्राप्त करण्यामध्ये मदत करण्याकरिता ऑन-दि-जॉब,क्षणात आणि ऑन-दि-गो लर्निंग सेवा देते.दाखवण्यात आलेलाजेमटेकचा'क्यू-क्लास'ही ऑन-लाइन शिक्षण व व्हिडिओ कॉन्फरन्स यंत्रणा आहे. ही यंत्रणा विविध युजर्सच्या गरजांची पूर्तता करणारी सुलभ व सर्वोत्तम सेवा देते. जेमटेकचे ऑनलाइन लॉगइन,नोंदणी व प्रतिक्रिया कन्टेन्ट हे सर्व प्रबळ माहिती सुरक्षा यंत्रणांद्वारे सुरक्षित केलेले आहेत,ज्यामुळे शिक्षक,विद्यार्थी व पालक या यंत्रणेचा सुरक्षितपणे व आत्मविश्वासने उपयोग करू शकतात.

भारत, व्हिएतनाम, थायलंड, इंडोनेशिया, फिलिपाइन्स व मलेशिया अशा देशांमध्ये ऑनलाइन या परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेबाबत बोलताना टायट्राचे कार्यकारी उपाध्यक्ष सायमन वँगम्हणाले,''जग कोविड-१९ महामारीचा सामना करत असताना तैवानच्या प्रबळ रिमोट वर्किंग सोल्यूशन्सची आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील उपस्थिती दिसून येत आहे. संशोधनातून भावी काम करण्याच्या ट्रेण्ड्सचे वाढते प्रमाण दिसून आले आहे,जसे नेक्स्ट-जनरेशन क्लाऊड व सॉफ्टवेअर डिलिव्हरीद्वारे सक्षम वितरित, डायनॅमिक व ऑन-डिमांड कामामध्ये वाढ. कोविड-१९ मुळे लवचिक व चपळ कार्यपद्धतींच्या गरजेला अधिक चालना मिळेल

# करोनावरचं ते प्रभावी औषध भारतात बनणार? अमेरिकन कंपन्यांबरोबर चर्चा सुरु

मुंबई, ता. ९ : रेमडेसिविर औषध निर्मितीसंबंधी जगातील आघाडीच्या केमिकल आणि औषध कंपन्यांबरोबर आमची बोलणी सुरु आहेत. भारतीय कंपन्या सुद्धा यामध्ये आहेत. गिलीयड सायन्सेसनेच बुधवारी स्वत: ही माहिती जाहीर केली. गिलीयड सायन्सेसकडे रेमडेसिविर अँटीव्हायरल ड्रगचे पेटंट आहे. अमेरिकेच्या अन्न आणि औषध प्रशासनाने एफडीएने करोना व्हायरसच्या रुग्णांवर उपचारांसाठी रेमडेसिविर औषध वापरण्याची परवानगी दिली आहे. हिंदुस्थान टाइम्सने हे वृत्त दिले आहे.

अमेरिकेत करोना व्हायरसच्या रुग्णांवर उपचारांमध्ये रेमडेसिविर औषध प्रभावी ठरल्याचे समोर आले आहे. व्हॉलंटरी लायसन्समध्ये पेंटटधारक जेनरीक औषधाच्या उत्पादकांना औषध बनवण्याची परवानगी देऊ शकतो. भारतामध्ये मोठया प्रमाणावर जेनरीक औषधांची निर्मिती केली जाते. भारत आणि पाकिस्तानातील जेनरीक औषध उत्पादकांना व्हॉलंटरी लायसन्स देण्यासंबंधी गिलीयड सायन्सेसची दोन्ही देशातील कंपन्यांसोबत चर्चा सुरु आहे. जेणेकरुन रेमडेसिविर औषध विकसनशील देशांमध्ये जास्ती जास्त प्रमाणात उपलब्ध होईल. गिलीयडकडून याबदल्यात औषध निर्मितीचे संपूर्ण तंत्रज्ञान देण्यात येईल.

सध्याच्या घडीला करोना व्हायरसवर अत्यंत परिणामकारक ठरणारे रेमडेसिविर औषध बनवण्याच्या दिशेने भारताने पहिले पाऊल टाकले आहे. हैदराबाद स्थित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजीने रेमडेसिविर औषध बनवण्यासाठी सुरुवातीला लागणाऱ्या साहित्याची निर्मिती केली आहे. औषधात वापरण्यात येणारे घटकद्रव्य बनवण्याच्या दृष्टीने टाकलेले हे पहिले पाऊल आहे.

उद्या गरज पडली तर भारतात रेमडेसिविर औषधाची निर्मिती सुरु व्हावी, यासाठी ने सिप्ला सारख्या औषध कंपन्यांसाठी टेक्नोलॉजीची प्रात्यक्षिक सुरु केली आहेत.अमेरिकेत रुग्णांवर या औषधाची चाचणी घेण्यात आली. त्यात रेमडेसिविर औषध प्रभावी ठरत असल्याचा अमेरिकेचा दावा आहे. रेमडेसिविर औषधामुळे करोना रुग्णांच्या प्रकृतीमध्ये वेगाने सुधारणा दिसून आली. शिवाय हे औषध करोना व्हायरसला ब्लॉक करते असा अमेरिकन संशोधकांचा निष्कर्ष आहे.

# विरारमध्ये पुन्हा एकदा झाले खाकीतल्या माणुसकीचे दर्शन

## लॉकडाउनमुळं नातेवाईक अंत्यसंस्काराला येऊ शकले नाहीत; पोलिसांनीच पार पाडले सोपस्कार

मुंबई, ता. ८ : लसूविरारमध्ये पुन्हा एकदा खाकीतल्या माणुसकीचे दर्शन झाले आहे. एकट्या राहणाऱ्या व्यक्तीचा अचानक मुत्यू झाल्यानं लॉकडाउमुळं त्याचे कोणतेही नातेवाईक अंत्यसंस्कारास येवू शकले नाहीत. त्यामुळे विरार पोलिसांनीच रीतीप्रमाणं या व्यक्तीवर अंत्यसंस्कार करून माणुसकीचे दर्शन घडवले. विरार पोलिसांतील पोलीस नाईक सुभाष शिंदे यांनी या मृतदेहावर सोपस्कार केले.

विरार पूर्व येथील फुलपाडा परिसरात राहणारे वर्षीय प्रमोद अयोध्या प्रसाद खारे हे रियल इस्टेट एजंटचा व्यवसाय करत होते. दोन वर्षापूर्वीच ते या परिसरात राहायला आले होते. ते अविवाहित असल्याने एकटेच राहत होते. बुधवारी रात्री ते नेहमीप्रमाणे आपलं काम संपवून घरी आले आणि जेवण करून झोपले. सकाळी शेजारी त्यांना उठवायला गेले असता त्यांनी दरवाजा उघडला नसल्याने शेजाऱ्यांनी खिडकीतून पहिले, तर त्यांना खारे हे बिछान्यावर निपचित पडलेले आढळून आले. यानंतर शेजाऱ्यांनी तातडीने विरार पोलिसांना याची माहिती दिली. यावेळी पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला आणि खारे यांना रुग्णालयात घेऊन गेले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना उपचारांपूर्वीच मृत घोषित केले. हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यु झाल्याचे वैद्यकीय तपासात समोर आले आहे.

यानंतर तपासाची जबाबदारी पोलीस नाईक सुभाष शिंदे यांच्यावर आली, शिंदे यांनी खारे यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधला आणि त्यांना घटनेची पूर्ण माहिती दिली. पण करोनाचा काळ सुरु असल्याने देशभरात लॉकडाउन असल्याने त्यांचे दिल्लीत राहणारे आई, भाऊ तर कोलकात्यात राहणारा दुसरा भाऊ यांना त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी येणं शक्य नव्हतं.

यावेळी पोलीस नाईक शिंदे यांनी खारे यांच्या कुटुंबातील सर्व रिती, प्रथांप्रमाणे खारे यांच्या मृतदेहावर सोपस्कार केले. हे करताना त्यांनी त्याच्या नातेवाईकांना व्हिडीओ कॉलवर ठेवले आणि त्यांना संपूर्ण प्रकिया दाखविली. त्यानुसार, आज दुपारी विरार पश्चिम येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार पार पाडले. खाकीतल्या या माणुसकीमुळे खारे कुटुंबियांनी विरार पोलिसांचे आभार मानले.

# हमाल, मापाडी कामगारांना अन्नधान्य कीट आणि दहा हजार रुपये मदत द्या

पुणे, ता. ८ : करोना संसर्गामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे मार्केट यार्डातील फळ, भाजीपाला, कांदा-बटाटा विभाग बंद आहे. परिणामी, मार्केट यार्डातील हमाल, मापाडी आणि महिला कामगारांना काम नाही. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खालावली आहे. या पार्श्वभूमीवर त्यांना मोफत अन्नधान्य कीट आणि प्रत्येकी दहा हजार रुपये देण्यात यावी, या मागणीचे पत्र कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक बी.जे. देशमुख यांना देण्यात आले आहे. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे यापूर्वीच ही मागणी करण्यात आली आहे. लातूर, अहमदनगर बाजार समितीने कामगारांना मदत देण्याच्या योजनेची अंमलबजावनी करण्यात येत आहे. पुणे बाजार समितीनेही ही योजना राबवावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली.


**नमुना क्र. आयएनसी -२६**

[कंपनी (स्थापना) अधिनियम, २०१४ चे नियम ३० नुसार]

**क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र, मुंबई, महाराष्ट्र यांच्या समक्ष**

कंपनी कायदा २०१३ चे कलम १३ (४) आणि कंपनी स्थापना अधिनियम २०१४चे नियम ३० प्रकरणात.

आणि

रायमझदा मेडिकल सिस्टीम्स प्रायव्हेट लिमिटेड (सीआयएन: यु३३११०एमएच२०१३पीटीसी२९६८१९) यांचे नोंदणीकृत कार्यालय : ए -१११ए, हिंद सौराष्ट्र इंडस्ट्रियल इस्टेट, मरोळ नका, अंधेरी - कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००५९

......याचिकाकर्ता कंपनी

सर्वसामान्य जनतेस येथे सूचना देण्यात येत आहे की, **सोमवार २३ डिसेंबर, २०१९** रोजी त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयात झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर विशेष ठरावानुसार कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय **महाराष्ट्र राज्यातील मुंबई येथून गुजरात राज्यात** स्थलांतरित करण्याकरिता कंपनीचे मेमोरँडम ऑफ असोसिएशनचे नियम २ (स्थिती नियम) नियोजित बदलण्याच्या निश्चितीसाठी कंपनीद्वारे क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र, मुंबई महाराष्ट्र यांच्याकडे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३ अंतर्गत अर्ज कण्याचे योजिले आहे.

कोणत्या व्यक्तीच्या हितास कंपनीचे नोंदणीकृत कार्यालयाच्या नियोजित बदलामुळे काही बाधा येत असल्यास त्यांनी त्याच्या हिताचे स्वरूप व विरोधाचे कारण नमूद केलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांचे आक्षेप रजि. पोस्टाने किंवा गुंतवणूकदार तक्रार नमुना भरून एमसीए-२१ (www.mca.gov.in) सदर सूचना प्रकाशन तारेखापासून १४ दिवसांच्या आत **क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र, एव्हरेस्ट, ५ वा मजला, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई - ४०० ००२** या कार्यालयात पाठवावी तसेच एक प्रत याचिकाकर्त्या कंपनीला त्यांच्या वर नमूद केलेल्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावी.

**याचिकाकर्त्याच्या वतीने व करिता**
**रायमझदा मेडिकल सिस्टीम्स प्रायव्हेट लिमिटेड**
**सही /-**
दिनांक : ०९/०५/२०२०
**रयोमंद पारडीवाला**
ठिकाण : मुंबई
**संचालक**



बँक ऑफ इंडिया
Bank of India BOI
नातं बँकिंग पलिकडचं

**मुख्य कार्यालय : स्टार हाऊस, सी-५, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०००५१.**

**११ जून, २०१० रोजी वितरीत ८.४८% बँक ऑफ इंडिया अप्पर टीयर २ बॉण्डस - सीरिज ६ आयएसआयएन नं. आयएनई ०८४ए०९२१७ संदर्भात कॉल ऑप्शनचे उपयोग व व्याज देण्यासाठी सूचना**

यथोचित प्राधिकरणाची मान्यता आणि नियामक व इतर मान्यतेवर अवलंबनासह येथे सूचना देण्यात येत आहे की, ११ जून, २०२० रोजी उपरोक्त बॉण्डसवर कॉल ऑप्शनचा उपयोग करणे आणि या उद्देशाकरीता ११ मे २०२० ही नोंद तारीख म्हणून घोषित करण्यात आली आहे. बॉण्डधारकांना या बाबत वैयक्तिक सूचना देण्यात आली आहे आणि ते बैंकेच्या **www.bankofindia.co.in** वर अनाऊन्समेन्ट अंतर्गत उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०८.०५.२०२०
**कंपनी सचिव**


# शहापूर, मुरबाड तालुक्यांवर पाणीसंकट

बदलापूर ता. ८ : करोना संकटाचा सामना करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा व्यस्त असताना शहापूर आणि मुरबाड तालुक्यांत पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होऊ लागले आहे. शहापूर तालुक्यात सध्या १८८ गावपाडय़ांमध्ये, तर मुरबाड तालुक्यातील २६ गावपाडय़ांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्यातच टाळेबंदीमुळे अनेक गावांच्या वेशी बंद करण्यात आल्या असल्याने तेथील विहिरींत पाणी सोडण्यासाठी जिल्हा प्रशासनाला कसरत करावी लागत आहे.शहापूर आणि मुरबाड या तालुक्यांना दरवर्षी उन्हाळय़ात पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागतात. यंदाही मार्चच्या अखेरीपासून शहापूरमधील आठ गावे आणि १३ पाडय़ांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. महिनाभरात शहापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गावपाडय़ांची संख्या २१६ पर्यंत पोहोचली आहे. तालुक्यात सध्याच्या घडीला ५६२ गावे आणि १६४ पाडय़ांमध्ये पाण्याची टंचाई आहे.

या टंचाईवर मात करण्यासाठी स्थानिक तहसील कार्यालयाकडून प्रांत कार्यालयाला टँकरची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर तालुक्यातील ४२ गावे आणि १४५ पाडय़ांमध्ये पाणीपुरवठा करण्यासाठी ३३टँकर उपलब्ध करून देण्यात आले आहेत, अशी माहिती तहसीलदार नीलिमा सूर्यवंशी यांनी दिली आहे. आणखी ३ टँकरची आवश्यकता असून त्यातून १० गावे आणि १९पाडय़ांना पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आल्याचेही सूर्यवंशी यांनी सांगितले. मात्र ही व्यवस्था पुरेशी नसल्याची ओरड आता होते आहे.मुरबाड तालुक्यातही पाणीटंचाईच्या झळा बसू लागल्या आहेत. गेल्या वर्षी पाणीटंचाईने मुरबाड तालुक्यातील ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागला होता. १८ गावे आणि ३८ पाडय़ांमध्ये भीषण टंचाई होती. यंदा सध्या ५ गावे आणि २१ पाडय़ांमध्ये टंचाई निर्माण झाली आहे. त्यासाठी ५ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती मुरबाडचे तहसीलदार अमोल कदम यांनी दिली आहे.

टँकरची संख्या वाढवण्याची मागणी अनेक ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे येत्या काळात या भागांतील पाणीप्रश्न बिकट होण्याची भीती व्यक्त होत आहे.

वेशी बंद असल्याने अडचणकरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी ग्रामीण भागातील अनेक गावांच्या वेशी ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन बंद केल्या आहेत. ज्या ठिकाणी या विषाणूचा प्रादुर्भाव फारसा नाही तेथील निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. असे असतानाही काही गावांमधील वेशीबंदीसाठी आग्रह धरला जात असून दादागिरीचे प्रकारही केले जात आहेत.

यापैकी काही गावांमध्ये पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. त्यामुळे टँकरच्या वाहतुकीवरदेखील अडथळे उभे राहात आहेत. विहिरीत पाण्याचे टँकर रिते केल्यानंतर पुन्हा गावच्या वेशी बंद केल्या जात आहेत.






P&G

**प्रॉक्टर ॲन्ड गॅम्बल हायजीन ॲन्ड हेल्थकेअर लिमिटेड**

CIN : L24239MH1964PLC012971

नोंदणीकृत कार्यालयः पी ॲण्ड जी प्लाझा, कार्डिनल ग्रेशस मार्ग, चकाला, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०९९.

दूरध्वनी : ९१-२२-२८२६ ६०००, फॅक्सः ९१-२२-२८२६ ७३३७, www.pg.com/en_IN/

## ३१ मार्च,२०२० रोजी संपलेल्या तिमाही व नऊमाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचा अहवाल

(रु. लाखात)

| | तपशील | (१) तिमाही अखेर ३१ मार्च २०२० | (२) मागील तिमाही अखेर ३१ डिसे. २०१९ | (३) संबंधित तिमाही अखेर ३१ मार्च २०१९ | (४) नऊमाही अखेर ३१ मार्च २०२० | (५) संबंधित नऊमाही अखेर ३१ मार्च २०१९ | (६) संपलेले मागील वर्ष ३० जून २०१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (अलेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) | (लेखापरिक्षित) |
| १. | **कार्यचलनातून एकूण महसूल** | **६५६०५** | **८५९२७** | **६९९३४** | **२३६७४६** | **२३०९२१** | **२९४६५०** |
| २. | **कालावधीकरिता निव्वळ नफा (कर व अपवादात्मक बाबपुर्व)** | **१२४८७** | **१८२००** | **१३८९८** | **४८८२५** | **५४९६८** | **६०७३३** |
| ३. | **कालावधीकरिता निव्वळ नफा (करपुर्व, अपवादात्मक बाबनंतर)** | **१२४८७** | **१८२००** | **१३८९८** | **४८८२५** | **५४९६८** | **६०७३३** |
| ४. | **करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा** | **९११०** | **१३५९३** | **९०११** | **३६३८७** | **३५८३४** | **४१९१३** |
| ५. | **कालावधीकरिता एकूण सर्वंकष उत्पन्न (कालावधीकरिता एकत्रित नफा (करानंतर) व ईंर सर्वंकष उत्पन्न (करानंतर))** | **९१७९** | **१३७२१** | **९००६** | **३६३९२** | **३५७५६** | **४१२४६** |
| ६. | समभाग भांडवल (रु.१०/- दर्शनी मूल्य प्रतिभाग) | ३२४६ | ३२४६ | ३२४६ | ३२४६ | ३२४६ | ३२४६ |
| ७. | इतर समभाग | - | - | - | - | - | ८७६६० |
| ८. | उत्पन्न प्रतिभाग (रु.१० दर्शनी मूल्य प्रतिभाग) (वार्षिकीकरण नाही) | | | | | | |
| अ) | मुळ | २८.०७ | ४१.८८ | २७.७६ | ११२.१० | ११०.३९ | १२९.१२ |
| ब) | सौमीकृत | २८.०७ | ४१.८८ | २७.७६ | ११२.१० | ११०.३९ | १२९.१२ |

टीप : सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन २०१५ च्या नियम ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजसह सादर करण्यात आलेली त्रैमासिक वित्तीय निष्कर्षाचे सविस्तर नमुन्यातील उतारा आहे. वित्तीय निष्कर्षाचे संपूर्ण नमुना कंपनी जेथे सूचिबध्द आहे त्या स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईटवर अर्थात बीएसई लिमिटेडच्या (www.bseindia.com) व एनएसई लिमिटेडच्या (www.nseindia.com) आणि कंपनीच्या (www.pg.com/en_IN) वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल हायजीन ॲण्ड हेल्थ केअर लिमिटेडच्या**
**संचालक मंडळाच्याकरिता आणि वतीने**
**सही/-**
**मधुसूदन गोपालन**
**व्यवस्थापकीय संचालक**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : ८ मे, २०२०**

**कृपया आमच्या वेबसाईटला भेट द्या www.pg.com/en_IN**